जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६८३ दिनांक -१२/०९/२०२३**

## सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर

# विनापरवाना वास्तव्य करणारे ०७ बांगलादेशी नागरीकांवर कारवाई तसेच अल्पवयीन बांगलादेशी पिडीत मुलीची सुटका करून आरोपीवर कारवाई

दि.१२/०९/२०२३ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर यांना प्राप्त गोपनिय माहिती वरुन बुधवार पेठ,पुणे परीसरातील वेश्या गल्लीतील कुंटनखान्यात बांगलादेशातुन विनापरवाना कोणत्याही वैद्य कागदपत्रांशिवाय तसेच भारत बांगलादेश सीमेवरील मुलकी अधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय बांग्ला देशातुन ०५ मुली व ०२ पुरुष यांनी भारत देशात अनधिकृत प्रवेश करुन पुणे शहरातील वर नमुद ठिकाणी अनाधिकृतपणे वास्तव्य करीत असल्याचे तसेच त्यांच्याकडे भारतीय नागरीकत्व शाबित करणारे कोणतेही दस्तऐवज नसल्याचे व ते बांगलादेश येथील नागरीक असल्याचे निषन्न झाल्याचे आढळुन आल्याने सामाजिक सुरक्षा विभागाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरोधात फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करून पारपत्र अधिनियम १९५० चे कलम ३ सह ६, परकीय नागरीक आदेश १९४८ चा नियम ३(१) सह परकीय नागरीक कायदा १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन ताब्यात घेतलेल्या ०५ बांगलादेशी महिला ह्या वेश्या व्यवसाय करीत होत्या व बांगलादेशी ०२ पुरुष हे वेगवेगळे व्यवसाय करीत होते. तसेच सदर परीसरा मध्ये एक अल्पवयीन बांगलादेशी पिडीत मुलीकडुन वेश्या व्यवसाय करून घेत असल्याबाबतची माहिती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी छापा टाकुन अल्पवयीन मुलीची सुटका करून तीन आरोपीवर फरासखाना पोलीस स्टेशन भादवि कलम ३७०,३७०(अ),३४४,३६३,३६६(अ),३४,पिटा ॲक्ट कलम ३,४,५,६,७ व बालकांचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम १६,१७ व पारपत्र अधिनियम १९५० चे कलम १४अ(अ,ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन फरासखाना पोलीस स्टेशन तपास करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री.संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाकडील वपोनि.श्री.भरत जाधव, सपोनि.अश्विनी पाटील, सपोनि.अनिकेत पोटे, सपोनि.राजेश माळेगावे, पोलीस अंमलदार,राजेंद्र कुमावत, बाबासो कर्पे, अजय राणे, तुषार भिवरकर, मनिषा पुकाळे, अमेय रसाळ, सागर केकाण, हणमंत कांबळे, इरफान पठाण, इम्रान नदाफ, रेश्मा कंक, अमित जमदाडे, संदीप कोळगे, किशोर भुजबळ, ओंकार कुंभार यांनी केलेली आहे.